**सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना ओळखपत्र देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. २१३/२०१७/२१-अ,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - २३ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.१८३/१८ (र. व का.), दि. २३/०२/ २०१७.

**शासन परिपत्रक**

**प्रस्तावना :-**

शासकीय अधिकारी/कर्मचारी ज्या पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत ते पद नमूद करुन संबंधित प्रशासकीय कार्यालय/विभागाने त्यांना कायमस्वरुपी फोटोसह ओळखपत्र देण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये आदेशित केले आहे. मंत्री आस्थापनेवरील पदे ही सावधी पदे (Tenure Posts) असून, सदर पदे ही राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग, क्षेत्रीय कार्यालये, महामंडळे, स्वायत्त संस्था इ. कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. मंत्री आस्थापनेवरील पदनामे व प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची त्यांच्या मूळ संवर्गातील पदनामे ही भिन्न स्वरूपाची आहेत. मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती ही मंत्रीमंडळाच्या कालावधीपर्यंत अथवा मा. मंत्री महोदयांना त्यांच्या सेवेची आवश्यकता भासेल, यापैकी जो अगोदरचा कालावधी असेल तोपर्यंतच असते. त्यामुळे, मंत्री आस्थापनेवरील सावधी पदावरून सेवानिवृत्त झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना मंत्री आस्थापनेवरील पदाच्या पदनामाचा उल्लेख करून ओळखपत्र देणे उचित होणार नाही.

२. यास्तव संदर्भाधीन शासन परिपत्रक दि. २३/०२/२०१७ च्या संदर्भात, मंत्री आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीनंतर ओळखपत्र, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या मूळ विभागाकडून देणे आवश्यक असल्याने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -

१. मंत्री आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या मूळ संवर्गातील पदनामाचे ओळखपत्र मिळण्याबाबतचे अर्ज, त्यांच्या मूळ विभागाकडे सादर करावेत.

२. मंत्री आस्थापनेवरील पदे ही सावधी पदे असल्यामुळे, मंत्री आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या मूळ विभागाकडून त्यांच्या संवर्गातील पदनामाचा उल्लेख करून कायमस्वरूपी ओळखपत्र देण्यात यावे.

३. ओळखपत्रामध्ये पदनाम नमूद करताना त्याआधी " सेवानिवृत्त " असा उल्लेख करण्यात यावा.

४. ओळखपत्र देण्यापूर्वी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे शासन सेवेत असतानाचे तसेच मंत्री आस्थापनेवर कार्यरत असताना दिलेले ओळखपत्र जमा केलेले आहे, याची खातरजमा करण्यात यावी.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालये, महामंडळे, स्वायत्त संस्था इ. यांना उपरोक्त आदेशाचे काटेकोरपणे पालन करून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना ओळखपत्र देण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१७११२३१३२३५३७५०७ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Somnath Namdeo Bagul

Digitally signed by Somnath Namdeo Bagul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b01714c1480a47cec5943a1c3c73ea95af0534418cf92d1ac844331c4116879d, cn=Somnath Namdeo Bagul
Date: 2017.11.23 13:27:21 +05'30'

**(सो. ना. बागुल)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) सर्व मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
५) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई-३
६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
८) मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई
९) निवड नस्ती.